# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २९७/२०२४ दिनांक- १३/०८/२०२४.

## “वसई कोळीवाडा गौसिया मस्जिद येथे दोन पुरुष बांग्लादेशी नागरीक यांचेवर कारवाई करुन आरोपी यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश”

वसई पोलीस ठाण्याचे हद्दीत वसई कोळीवाडा गौसिया मस्जिद वसई पश्चिम ता.वसई जि.पालघर, याठिकाणी परकीय नागरीक अनधिकृत पणे भारतात राहत असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाली असता सदर वेळी दोन लायक पंच यांना कार्यालयात बोलावुन घेवुन सदर परकीय नागरीकांवर नालासोपारा येथे जावुन कारवाई करण्याच्या सुचना देवून सदर बातमीची खातरजमा करुन पंच व पोलीस पथक असे जावून दि.०८/०८/२०२४ रोजी कारवाई करुन वसई कोळीवाडा गौसिया मस्जिद वसई पश्चिम.ता.वसई जि.पालघर,येथील अनधिकृतपणे राहत असलेले बांग्लादेशी नागरीक दोन पुरुष यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, वसई कोळीवाडा गौसिया मस्जिद वसई पश्चिम ता.वसई जि.पालघर, परीसरामध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेले परदेशी नागरीक यांच्या मिळालेल्या माहीतीच्या आधारे वसई कोळीवाडा येथे जावुन पंच व पथक असे सशंयीत आरोपीत राहत असलेल्या ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी सशंयीत दोन पुरुष मिळुन आल्याने त्यांना पोलीसांनी त्यांची ओळख करुन देवुन सदर व्यक्तिना त्यांचा नाव ,पत्ता व भारतीय नागरीकत्वाची कागदपत्रे विचारले असता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) अमीनुर सैदुल मेस्त्री वय २६ वर्षे रा.कोळीवाडा, मच्छिमार्केट बाजूला वसई गाव ता.वसई जि.पालघर मुळ रा.बांग्लादेशी, २) सलीम अक्रम शेख वय ४१ वर्षे रा.साईदत्त नगर चाळ,कोळीवाडा वसई जि.पालघर मुळ देश बांग्लादेशी असे सांगितले असून त्यांचेकडे त्यांचे भारतात येण्याकरीता व्हिझा पासपोर्ट नसून ते अनधिकृत पणे भारतात प्रवेश करुन येवुन अवैधरित्या वास्तव करीत असल्याचे कबुल केल्याने सदर दोन पुरुष बांग्लादेशी आरोपी यांचेवर वसई पोलीस ठाणे गु.रजि.नं.१९०/२०२४ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३(अ),६(अ),सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त श्री. अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व पोहवा/शिंदे, मपोहवा/ डोईफोडे, चालक पोहवा/पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा विभाग तसेच सफौ/पाटनकर व पोशि/गर्जे नेम- वसई पोलीस ठाणे यांचेसह उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-------------0000------------